## विशेष पोलीस महानिरीक्षक, कोंकण परिक्षेत्र कार्यालय, कोंकण भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई

**जाहिरात क्रमांक :** ४०४५ /२०२३ दिनांक : २०/०९/२०२३.

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्रमांक अेपीओ-३१०६/प्र.क्र.२२७/पोल-३, दिनांक २१/०८/२००६ व क्र.एसपीपी-२३००५/प्र.क्र.२४७/पोल-१०, दिनांक १५/०९/२००६ अन्वये विशेष पोलीस महानिरीक्षक, कोंकण परिक्षेत्र, कोंकण भवन, नवी मुंबई कार्यालयातील विधी अधिकारी गट-अ हे पद पुर्णतः कंत्राटी पध्दतीने ११ महिन्याकरिता भरावयाचे आहेः-

२/- त्यामुळे खालील नमुद शैक्षणिक अर्हता, अनुभव व इतर अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या उमेदवरांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. तरी पात्र व इच्छुक उमेदवारांनी खालील नमुन्यात आवश्यक प्रमाणपत्राच्या साक्षांकित झेरॉक्स प्रतीसह अर्ज, विशेष पोलीस महानिरीक्षक, कोंकण परिक्षेत्र, ६ वा मजला, कोंकण भवन सीबीडी, बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांचे नांव दि.२०/१०/२०२३ रोजी संध्याकाळी १७.०० वाजेपर्यन्त पोहचतील या बेताने पाठवावेत. तदनंतर प्राप्त झालेल्या कोणत्याही अर्जाचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

३/- सदरचे पद हे ११ महिन्याचे पुर्णतः कंत्राटी पध्दतीने भरण्यात येणार असून त्यासाठी खालीलप्रमाणे एकत्रित मासिक वेतन + दूरध्वनी व प्रवास खर्च देय राहिल. या व्यतिरिक्त निवड झालेल्या उमेदवारांना इतर कोणतेही शासकिय वेतन व भत्ते अदा करणेत येणार नाही.

विधी अधिकारी गट-अ -: रुपये ३००००/- + ५०००/-

४/- वर नमूद करणेत आलेल्या सदर पदासाठी खालील प्रमाणे शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव व इतर अटी व शर्ती लागू राहतील.

**सुचनाः-**

**१)** पुर्णतः कंत्राटी पध्दतीने विधी अधिकारी गट-अ या पदाकरिता करावयाचे अर्ज सोबत दिलेल्या विहित नमुन्यातील अर्ज परिपुर्ण भरुन लिफाफ्यात घालुन लिफाफ्याच्या उजव्या बाजुला ठळक अक्षरात विधी अधिकारी गट-अ असे पद नमुद करुन विशेष पोलीस महानिरीक्षक, कोंकण परिक्षेत्र, ६ वा मजला, कोंकण भवन सीबीडी, बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांचे नावे दिनांक २५/०९/२०२३ ते दि. २०/१०/२०२३ रोजी संध्याकाळी १७.०० वाजेपर्यन्त पोहचतील या बेताने पाठवावेत.

**२)** दिनांक २०/१०/२०२३ रोजी संध्याकाळी १७:०० वाजेनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

**३)** अर्जासोबत पत्रव्यवहाराकरिता उमेदवाराचा पत्ता असलेले दोन लिफाफे जोडावे.

**४)** अर्जाचा नमुना https://thaneruralpolice.gov.in/ या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आलेला आहे. सदर अर्जाचा नमुना डाऊनलोड करुन अर्ज परिपुर्णरित्या भरावा.

**५)** अर्जासोबत विहित शैक्षणिक पात्रता व अनुभवाचे प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती जोडाव्यात.

**अटी व शर्ती** :-

१) सदर पदांची नेमणूक ही पूर्णतः कंत्राटी पध्दतीने असेल, उमेदवाराला शासकिय कर्मचारी / अधिकारी म्हणून गणले जाणार नाही.

२) सदर नेमणूका या करार पध्दतीने प्रथमतः ११ महिन्यासाठी करण्यात येतील. ११ महिन्यानंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत वेळोवेळी (जातीत जास्त २ वेळा, ११ महिन्यांकरिता) वाढविता येईल. २ वेळा मुदतवाढ दिल्यानंतरही अशा उमेदवाराची पुनश्चः नियुक्ती करणे आवश्यक आहे असे, सक्षम प्राधिकाऱ्याचे मत झाल्यास त्या उमेदवारास पुनश्चः निवड प्रक्रियेला सामोरे जावे लागेल.

३) निवड केलेला उमेदवार ११ महिन्याच्या कराराच्या कालावधीत वकिली व्यवसायाशी संबंधीत कोणत्याही प्रकारचे खाजगी काम / व्यवसाय नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या लेखी पूर्व परवानगीशिवाय करु शकणार नाही.

जर नियुक्ती प्राधिकाऱ्यांने सदर बाबतची परवानगी नाकारली असेल आणि परवानगी नाकारल्यावरही उमेदवाराने खाजगी व्यवसाय सरु ठेवला असेल व तसे करण्याने शासनाच्या कामात व्यत्यय किंवा आर्थिक नुकसान होत असेल तर अशा उमेदवारांची नियुक्ती रद्द करण्यात येईल. अशा उमेदवारांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**परिक्षा पध्दती (परिक्षा एकुण गुण ७५)**

१) उमेदवाराच्या निवडीकरीता लेखी परीक्षा ५० गुणांची व तोंडी परिक्षा २५ गुणांची असेल.
२) नियुक्ती देणेकरीता उमेदवारांनी कमीत कमी ६०% गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.
३) लेखी परिक्षा व तोंडी परिक्षेत प्राप्त गुण एकत्रित करुन एकुण गुणानुक्रमानुसार गुणवत्ता पात्र ठरलेल्या उमेदवारांतून कंत्राटी पध्दतीने नेमणूकी संबंधी कार्यवाही करण्यात येईल.

**४) उमेदवारांची लेखी परिक्षा खालील विषयांवर घेण्यात येईल.**

अ) प्रचलित फौजदारी कायदे (मेजर ॲक्ट/मायनर ॲक्ट) मा. उच्च न्यायालय/मा. सर्वोच्च न्यायालय यांचे न्यायनिवाडे.

ब) मा. उच्च न्यायालय, मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणा समक्ष एखाद्या प्रकरणांत दाखल करावयाचे परिच्छेद निहाय अभिप्राय किंवा शपथपत्र (संक्षिप्त स्वरुपात) अशा इच्छुक उमेदवारांना तयार करता येते का याची खात्री करण्याबाबतचे प्रश्न विचारण्यात येतील.

क) सेवाविषयक आणि फौजदारी स्वरुपाच्या प्रकरणांचा समावेश करण्यात येईल.

ड) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या सापळा प्रकरणात किंवा फौजदारी प्रकरणां संबधीत १९७५ मधील कलम १९७ किंवा महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी अधिनियम १९९९ मध्ये मंजुरी मधील प्रकरणात अभियोग दाखल करण्याची परवांनगी देणे किंवा न देणे याबाबत निर्णय घेता येणे सुलभ होईल अशा प्रकरणांची छाननी करण्याची क्षमता तपासणाऱ्या प्रश्नांचा समावेश करणेत येईल.

इ) लेखी परिक्षेत सेवाविषयक व फौजदारी प्रकरणांतील वेगवेगळया व महत्वाच्या मुद्यांवर सध्याची न्यायिकस्थिती (Settled position of law) काय आहे याबाबत प्रश्न विचारण्यात येतील.

**मासिक देय रक्कमः-**

विधी अधिकारी गट-अ या पदाकरीता मासिक रक्कम रु. ३०,०००/- आणि दुरध्वनी व प्रवास खर्चाकरिता रु. ५०००/- देय राहील (उपरिनिर्दिष्ट मर्यादेपेक्षा) इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

**शैक्षणिक अर्हता व अनुभवः-**

१) उमेदवार हा मान्यताप्राप्त विद्यापीठाचा कायद्याचा पदवीधर व बार परिषदेचा सनदधारक असणे आवश्यक आहे.
२) विधी अधिकारी गट-अ या पदासाठी उमेदवाराचे वय नियुक्तीवेळी ६० वर्षापेक्षा जास्त नसेल.
३) अनुभवः- उमेदवारास वकीली व्यवसायातील किमान ७ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.
४) उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेचे पुरेसे ज्ञान असावे.
५) उमेदवार गुन्हेगारी विषयक, सेवाविषयक, प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थिती तथा विभागीय चौकशी इ. बाबतीत ज्ञानसंपन्न असेल ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही तो कार्यक्षमतेने पार पाडू शकेल.

**किंवा**

६) जी व्यक्ती शासकिय सेवेत असताना प्रत्यक्षपणे विधीविषयक कामकाज हाताळत होती आणि ज्या व्यक्तीस गुन्हेगारी, प्रशासकीय व सेवाविषयक कायद्यांविषयक सखोल ज्ञान असेल त्याचप्रमाणे मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार प्रस्थापित समकालीन कायद्याचे ज्ञान असेल अशा व्यक्तीची शासकिय सेवा ही केवळ अनुभवासांठी ग्राह्य धरण्यात येईल. सदर व्यक्तीस नियुक्तीबाबतच्या अन्य अटी लागू राहतील. शासकीय सेवेत कार्यरत व्यक्ती निवडीस अपात्र असेल.

**कर्तव्ये व जबाबदाऱ्याः-**

१. कार्यालयाकडे प्राप्त होणाऱ्या सर्व प्रकारच्या कायदेविषयक बाबींबाबत / न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.
२. सेवाविषयक / प्रशासकीय बाबी / विभागीय चौकशी तथा समकालीन कायद्याची प्रस्थापित स्थिती याबाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे.

३. प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकिलाकडे पाठपुरावा करणे, जेथे शासन प्रतिवादी आहे अशा प्रकरणी सादर करावयाची प्रतिज्ञापत्रे संबंधीत अधिकाऱ्यांच्या मदतीने तयार करणे.

४. शपथपत्राचा मसुदा तयार करणे व त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेऊन न्यायालयात विहित मुदतीत सादर होईल हे पाहणे.

५. जेथे शासनाच्या विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे अशा प्रकरणामध्ये न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करुन तदनुषंगाने अपील दाखल करण्याच्या संदर्भात उचित कार्यवाही करणे.

६. अपील करणे योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास अपीलाचा मसुदा तयार करुन तो संबंधीत सरकारी वकिलाकडे पाठविणे व अपिलाचा अंतिम निर्णय लागेपर्यन्त पाठपुरावा करणे.

७. विधीविषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमून दिलेले कार्य विहित मुदतीत पार पाडणे.

८. पोलीस स्टेशनमध्ये प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यास योग्य ती मदत करणे.

९. वरिष्ठ कार्यालयाकडुन जे काम करण्याबाबत आदेश दिले जातील त्या कामाची पुर्तता वेळेत करणे. त्याबाबत वेगळे मानधन दिले जाणार नाही.

**<u>उमेदवारांस आवश्यक सूचनाः-</u>**

१) वरील सर्व नमूद अटी, अर्हता व अनुभव असणारे तसेच आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची पूर्तता करणारे उमेदवार सदर पदासाठी पात्र राहतील.

२) नियुक्ती दिलेल्या उमेदवारास या कार्यालयामार्फत देण्यात येणारा करारनामा रु.१००/- शुल्काच्या मुद्रांकावर (बाँड पेपरवर) (Agreement) भरणे अनिवार्य राहील.

३) करार पध्दतीने नेमणूक करण्यात येणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना एकत्रित वेतन आणि अनुज्ञेय दुरध्वनी व प्रवास खर्चाव्यतिरिक्त (उपरर्निदीष्ट मर्यादेपेक्षा) इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत.

४) उमेदवारांनी विहित केलेल्या शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा व अनुभव या अटी दि.३१/१०/२०२३ पर्यन्त पूर्ण करणे आवश्यक आहे.

५) अर्जासोबत २.५ से.मी. २.५ से.मी.आकाराचे सध्याचे काढलेले २ रंगीत फोटो जोडावेत.

६) उमेदवारांची पात्रता, भरती प्रक्रिया इ. विषयी निर्णय घेण्याचा सर्व अधिकार हा निवड मंडळाला राहील व तो सर्व उमेदवारांवर बंधनकारक राहील.

७) लेखी परिक्षेचा व तोंडी परिक्षेचा दिनांक व वेळ उमेदवारांना नंतर पत्राद्वारे/संकेतस्थळाद्वारे/ एसएमएसद्वारे कळविण्यात येईल.

८) उमेदवाराला कोणताही प्रवासखर्च देण्यात येणार नाही.

९) भरतीतील प्रक्रियेतील प्रत्येक टप्याबाबत निवडसमितीचा निर्णय अंतिम राहील.

१०) विधी अधिकारी गट-अ पदाच्या भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी किंवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास उमेदवारांस अपात्र ठरविण्यात येईल.

( **प्रविण पवार** )
विशेष पोलीस महानिरीक्षक,
कोंकण परिक्षेत्र,नवी मुंबई.

# अर्जाचा नमुना

**विशेष पोलीस महानिरीक्षक, कोंकण परिक्षेत्र कोंकण भवन, नवी मुंबई यांचे कार्यालयात**
**विधी अधिकारी गट - अ पदाकरीता अर्ज**

उमेदवाराचा अलीकडील काळातील फोटो चिकटवून साक्षांकित करावा तसेच दुसरा फोटो स्वाक्षरी करुन अर्जासोबत जोडावा.

कार्यालयीन उपयोगासाठी

१. अर्ज क्र. | | | | |

२. अर्ज स्विकारल्याचा दिनांक

३. अर्ज स्विकारण्याची स्वाक्षरी दिनांकासहित —

सूचना :- अर्जातील अंक फक्त इंग्रजीत लिहावेत.
अर्जदाराने माहिती फक्त मराठीत लिहावी. व # दर्शविलेल्या ठिकाणची माहिती फक्त इंग्रजीत लिहावी.
*आवश्यक नसेल तेथे खोडावे.

## अ) अर्जदाराची वैयक्तिक माहिती

१. अर्जदाराचे संपूर्ण नांव :- आडनांव नांव वडिलांचे/पतीचे नांव

मराठीत ..............................................................

# इंग्रजीत :

२. पत्रव्यवहाराचा पत्ता ..........................................................

तालुका .............. जिल्हा................ पिनकोड

३. कायमचा पत्ता ..........................................................

तालुका .............. जिल्हा................ पिनकोड

४. दूरध्वनी क्रमांक (लँडलाईन) ............... मोबाईल क्रमांक

ई-मेल आयडी ................................................

५. जन्मदिनांक :

दिवस महिना वर्ष

६. दिनांक ३१/१०/२०२३ रोजीचे वय

| वर्षे | महिना | दिवस |
|---|---|---|
| | | |

७. लिंग : पुरुष - ☐ महिला - ☐

८. धर्म - ☐ जात - ☐

९. महाराष्ट्र राज्याचे रहिवासी आहात का ? होय - ☐ नाही- ☐

योग्य असेल त्या ठिकाणी ( √ ) अशी खुण करावी.·

## ब) अर्जदाराची शैक्षणिक माहिती

१०. शैक्षणिक अर्हता –

| शिक्षण | शैक्षणिक संस्थेचे नांव, विद्यालय व महाविद्यालय | बोर्ड/विद्यापीठ | उत्तीर्ण झाल्याचा दिनांक | मिळालेले गुण | मिळालेली टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| माध्यमिक शालांत परिक्षा (इयत्ता १० वी अथवा जुनी ११ वी परीक्षा) | | | | | |
| उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा | | | | | |
| पदवी | | | | | |
| विधी पदवी | | | | | |
| पदव्युत्तर परीक्षा | | | | | |

११. इतर शैक्षणिक अर्हता (असल्यास) :- ..............................................

संगणक प्रशिक्षीत आहात काय ? होय - ☐ नाही- ☐

१२. अर्जदाराची इतर माहिती

अ) सनद घेतल्याचा दिनांक - ....................

ब) उमेदवाराने स्वतः हाताळलेल्या केसेसचा तपशिल :-

| अ.क्र. | न्यायालयाचे नांव | केसेसचा प्रकार | केसेसच्या संख्या |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |

**(उपरोक्त तक्ता अर्जासोबत स्वतंत्र जोडावा)**

टिप :- वकील व्यवसायाचे अनुभवाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

१३.-अ अर्जदारावर यापुर्वी कोणत्याही अपराधाबाबत कधीही अटक करण्यात/स्थानबध्द करण्यात/ दंड करण्यात/सिध्ददोषी ठरविण्यात आलेले आहे काय ? किंवा लोकसेवा आयोगाकडुन त्यांच्या परिक्षांना बसण्यास मनाई करण्यात अथवा अपात्र ठरविण्यात आले आहे काय ? किंवा कोणत्याही विद्यापीठाकडुन/शैक्षणिक संस्थेकडुन कोणत्याही परीक्षेस बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय ? अथवा काढुन टाकण्यात आले आहे काय ? - .................

१३-ब हा अर्ज भरतेवेळी कोणत्याही न्यायालय/विद्यापीठ/कोणत्याही शैक्षणिक संस्थेत उमेदवाराविरुध्द कोणतेही प्रकरण प्रलंबत आहे काय ? ................

१३-अ आणि १३-ब चे उत्तर 'होय' असल्यास सदर प्रकरणाचा सविस्तर तपशिल -

...........................................................................................

...........................................................................................

...........................................................................................

१४. सदर अर्जात भरलेला सर्व मजकूर खरा आहे व अर्जदारास मान्य आहे. सदरबाबत कोणतीही माहिती चुकीची अथवा खोटी आढळल्यास त्याबाबत उचित कार्यवाही करण्यास अर्जदाराची कोणतीही हरकत राहणार नाही.

१५. निवड प्रकियेबाबतची कार्यवाही करणेचे तसेच निवड झालेल्या उमेदवाराची निवड कोणत्याही कारणास्तव व कोणत्याही टप्प्यावर केव्हाही रद्द करण्याचे तसेच परीक्षेसंबंधीचे नियमात बदल करण्याचा अधिकार सर्वस्वी नियुक्ती प्राधिका-यास राहील.

वरील सर्व अटी व शर्ती मला मान्य असुन त्या अटी व शर्तींच्या अधीन राहुन मी सदरचा अर्ज करीत आहे.

अर्जदाराची स्वाक्षरी व संपूर्ण नांव

# अर्जदाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र

मी श्री/सौ/कु ................................................ याद्वारे प्रतिज्ञापूर्वक असे जाहिर करतो/करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषानुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. अर्जात नमूद केलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी निवड/नियुक्ती रद्द केल्यास याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जात नमूद केलेली माहिती खोटी अथवा चुकीची असल्यास त्याची पूर्णपणे जबाबदारी माझ्यावर राहील. व त्याबाबतीत माझ्याविरुध्द कायदेशीर कारवाईस मी पात्र राहीन. तसेच मी भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी किंवा गैरप्रकारचा अवलंब केल्यास मी अपात्र ठरेल.

ठिकाण :-

दिनांक :-

अर्जदाराची सही
(दिनांकासह)

सोबत :- अर्जात नमूद केलेल्या बाबींच्या आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रमाणित केलेल्या छायांकित प्रती जोडाव्यात.